नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

**औरंगाबाद कृषी हवामान सल्ला** — **मंगळवार, दिनांक – ०३.११.२०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक ०४ ते ०८ नोव्हेंबर, २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०४/११ | ०५/११ | ०६/११ | ०७/११ | ०८/११ |
| पाऊस | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३२ | ३२ | ३३ | ३२ | ३३ |
| किमान तापमान (अं.से.) | १७ | १७ | १७ | १६ | १६ |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ४८ | ५० | ४२ | ४७ | ४७ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २८ | २५ | २२ | २२ | २४ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ४ | ३ | ५ | ७ | ७ |
| वा-याची दिशा | पूर्व | पूर्व | पूर्व | पूर्व | पूर्व |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानूसार पुढील पाच दिवसात आकाश स्वच्छ राहील. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| कापूस | वेचणी अवस्था | कापूस पिकाची वेचणी करून घ्यावी. |
| तुर | कळी ते फुले लागणे अवस्था | तूर पिकात अळ्यांचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ टक्के २० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४.४ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| रब्बी ज्वारी | पेरणी अवस्था | बागायती रब्बी ज्वारी पिकाची पेरणी केली नसल्यास लवकरात लवकर पेरणी करून घ्यावी. |
| केळी | वाढीची अवस्था | केळी बागेत तण नियंत्रण करावे. |
| गहू | पेरणी अवस्था | गहू पिकाच्या पेरणी २० नोव्हेंबर पर्यंत करता येते. |
| आंबा | वाढीची अवस्था | आंबा फळबागेत चांगला मोहोर लागण्यासाठी बागेला पाणी देऊ नये. आंबा बागेत तण नियंत्रण करावे |
| द्राक्ष | फांद्या वाढीची अवस्था | द्राक्षे बागेला पाण्याचा ताण बसणार नाही याची काळजी घ्यावी. आवश्यकतेनुसार द्राक्षे बागेत पाणी व्यवस्थापन करावे. |
| सिताफळ | फळवाढीची अवस्था | काढणी केलेल्या फळाची प्रतवारीकरूनच बाजारात पाठवावे. |
| भाजीपाला | वाढीची / काढणी अवस्था | उपलब्ध असलेल्या पाण्यानुसार रब्बी भाजीपाला पिकाची लागवड करावी.काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकाची काढणी करावी. |
| फुलशेती | वाढीची / काढणी अवस्था | फुल बागेत तण नियंत्रण करावे व काढणीस तयार आलेल्या फुलांची काढणी करून घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| पशुधन व्यवस्थापन | -- | मुबलक पाऊस व त्यामुळे वाढणारे बाह्यपरजीवी (ऊवा, पिसवा, गोचीड व चावणाऱ्या कीटकवर्गीय माशा) यांचा प्रादुर्भाव पशुधनास त्रस्त करत आहेत. म्हणून पशुपालकांनी या कालावधीमध्ये ५% निंबोळी अर्क किंवा वनस्तीजन्य कीटकनाशक (कडूनिंब तेल १५ मिली + कारंज तेल १५ मिली + २ ग्राम मऊ साबण + १ लिटर पाणी ) हे द्रावण आठवड्याच्या अंतराने पशुधनावर, गोठ्यामध्ये सभोवताली साचलेल्या पाण्याचे डबके, खच खळगे/नाली व शेणाच्या ढिगाऱ्यावरती फवारावे. हे वनस्तीजन्य कीटकनाशक कीटक रोधक व कीटक/ गोचीडाचे जीवनचक्र तोडून त्यांची संख्या घटवण्यासाठी मदत करते. |

**सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.**